परिपत्रक क्र.कोविमं/शाखालेखा/धनादेश /२०१८/दिनांक/११/०९/२०१८/

**विषय:- माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१८ परीक्षेपासून परिक्षेशी निगडीत घटकांना मंडळाकडून मानधनाप्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या धनादेशाबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरून माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१७ परीक्षेपासून मुख्य नियामक, वरिष्ठ नियामक, परीक्षक, मुख्याध्यापक-माध्यमिक शाळा आणि प्राचार्य-कनिष्ठ महाविद्यालये, केंद्रसंचालक इत्यादींनी मुदतबाहय तारखेनंतर धनादेश बदलून देणेबाबत केलेल्या विनंती पत्रावर निर्णय घेणेबाबतचा विषय या कार्यालयाच्या दि. १३.०६.२०१७ रोजीच्या तदर्थ समिती सभेत मंजूर करण्यात आलेल्या ठराव क्र. ३५ नुसार धनादेश अदा केलेल्या तारखेपासून सहा महिन्यापर्यंत सदरचा धनादेश बदलून देण्यात यावा व स्टेशनरी खर्च म्हणून रू. १००/- कपात करण्यात येवून धनादेश एकदाच बदलून देण्यात यावा तसेच दोनवेळा धनादेश बदलून देण्यात येवू नये. तसेच संबंधितांचे देयक जर रू. १००/- च्या आतील असेल तर एक वर्षाच्या आत रोखीने अदा करण्यात यावे. त्यानंतर देण्यात येवू नये असे सर्वानुमते ठरले होते.

तथापि परीक्षक, नियामक व अन्य घटकांकडून विभागीय मंडळाकडे ०१ वर्ष किंवा त्यापेक्षाही अधिक कालावधीनंतर उशीरा देयके मंडळ कार्यालयाकडे सादर केली जातात व अशी देयके प्रदानार्थ लेखा शाखेकडे संबंधित शाखांकडून पाठविण्यात येतात.

शासकीय नियमावली (BFR १९५९-३९ (अ) (ग) तसेच MTR १५१ (१) नुसार संबंधिताने देयक ०१ वर्षानंतर सादर केल्यास व असे देयक किरकोळ स्वरूपाचे असल्यास (रू. ५००/- च्या आतील) ते नाकारणेत यावे व अन्य देयकांबाबत कार्यालय प्रमुखाच्या मान्यतेने अदा करणेचे आहे. असा नियम आहे. यावर दिनांक २५/०७/२०१८ च्या रोजीच्या सक्षम समितीमध्ये सविस्तर निर्णय घेवून उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

तरी सर्व मुददयांची नोंद घेवून आपल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षेशी संबंधित सर्व घटकांना सदर बाब अवगत करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर.